# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर
## P.R.O Office, Palghar
Phone No. 02525-297032, Mob No.8669604078
Address: SP Office, Bidco Road, Palghar(W)
E-mail : propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.८४ दिनांक २४/०८/२०२१
## पोलीस अधीक्षक, पालघर यांची आसे गावाला भेट.
## बंदबिगारीबाबत माहीती देण्यासाठी आवाहन.

दिनांक १३/०७/२०२१ रोजी श्री काळु धर्मा पवार वय ४८ वर्षे रा. मु.पोस्ट आसे, ता.मोखाडा, जि.पालघर, यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. याबाबत मोखाडा पोलीस ठाणे येथे काही एक न कळवता मृतकाचे कुटुंबिय व गावातील लोकांनी जोराचा पाऊस येत असल्याने राहते गावीच खड्डा खोदुन प्रेत दफन करुन अंत्यविधी केला होता. दिनांक ०२/०८/२०२१ रोजी श्रीमती सावित्री काळु पवार यांनी पोलीस ठाणे मोखाडा येथे येऊन कळविले की, त्यांचा मुलगा दत्तु काळु पवार, वय १४ वर्षे, याने गावाच्या बाजुस असलेल्या एका उंच डोंगराच्या कडयावरुन उडी मारुन मयत झाला होता. श्री. काळु पवार हे गावातील शेतकरी रामदास कोरडे यांच्या कडे रोजनदारीवर काम करत होते. श्री. काळु पवार यांना दारु पिण्याचे व्यसन होते. रोजनदारीच्या बदल्यात रामदास कोरडे हे पैसेही देत होते. रामदास कोरडे यांची बिअर शॉप असल्याने श्री.काळु पवार यांना दारु पिण्यासाठी मिळत होती.

दिनांक १२/०७/२०२० रोजी श्री.काळु पवार हे शेतातुन आल्यानंतर गावात गेले व ऊशिरा घरी आले. त्यावेळी ते दारुच्या नशेत होते व तसेच झोपले. मुलगी धनश्री ही तिचा मामा सुरेश चंदर दिवे यांच्या घरी झोपण्यासाठी गेली होती. दिनांक १३/०७/२०२१ रोजी सकाळी ०७.०० वाजताच्या सुमारास मामाच्या घरुन कु. धनश्री घरी आली असता वडील श्री.काळु पवार यांनी गळफास घेतल्याचे लक्षात आले.

याबाबत दिनांक ०२/०८/२०२१ रोजी श्रीमती सावीत्री काळु पवार वय ४३ वर्षे यांनी मोखाडा पोलीस ठाणे येथे येवुन खबर दिली. यावरुन आ.मृ.क्र. २९/२०२१ फौजदारी प्रक्रीया संहिता कलम १७४ अन्वये अकस्मात मृत्यु दाखल करण्यात आला. यावेळी श्रीमती सावीत्री काळु पवार यांनी असे सांगितले की मुलगा दत्तु पवार यांचे अंत्यविधी करीता ५०० रुपये घेतले होते. त्याची परतफेड करण्याकरीता श्री.काळु धर्मा पवार हे रामदास कोरडे यांच्या शेतामध्ये काम करीत होते. श्री.रामदास कोरडे यांना वैतागुन श्री.काळु धर्मा पवार यांनी आत्महत्या केली असल्याचा संशय आहे. या अनुषंगाने अकस्मात मृत्यु दाखल केल्यानंतर जे.जे.हॉस्पीटल, मुंबई येथे शवविच्छेदन करण्यात आले आहे. त्यामध्ये मानेवर दोरीची खुण असल्याचे नमुद असुन अंतिम अभिप्राय राखुन ठेवले आहेत.

Scanned with CamScanner

याप्रकरणी दिनांक २०/०८/२०२१ रोजी मोखाडा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र ६१/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ३७४ सह बंदबिगारी पध्दती (उच्चाटन) अधिनियम-१९७६ चे कलम १७, १८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपी रामदास कोरडे यास दिनांक २२/०८/२०२१ रोजी अटक करण्यात आली असुन दिनांक २३/०८/२०२१ रोजी मा.न्यायालयाने जामीनावर मुक्त केले आहे. सदर गुहयाचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक श्री.तारगे हे करीत आहेत.

दिनांक २३/०८/२०२१ रोजी श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक,पालघर, श्रीमती.आयुषी सिंग, उपविभागीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, मोखाडा यांनी घटनास्थळ व गावभेट दिली आहे. मृतकाच्या कुंटुंबाकडे चौकशी करुन मृतकच्या मुलींना नजीकच्या आश्रम शाळेमध्ये प्रवेश देवुन शिक्षणाच्या सर्व सुविधा देण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर वेळी श्री. प्रशांत परदेशी, उपविभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग, श्री.वैभव पवार तहसिलदार,मोखाडा, तलाठी, सरपंच, ग्रामसेवक व उपस्थित गावकरी यांची सभा घेण्यात आली. या सभेमध्ये गावक-यांनी सांगितले की, गावामध्ये व परिसरात बंदबिगारी दिसुन येत नाही. याउलट मागणी पुरवठयाच्या बाबतीत मंजुरांचा तुटवडा आहे. यापरिसरातील कोणताही शेतकरी मजुरांना बंदबिगारी ठेवत नाहीत. सर्व साधारण जनजागृती चांगली असुन नागरिकांना स्वतः च्या अधिकाराबाबत माहिती आहे. शेतकरी हे भात व नागली लागवडी साठी मजुरांना वेळच्यावेळीला मजुरी देतात.

श्री.रामदास कोरडे यांच्या शेतामध्येही भात आवणीसाठी गावातील इतर मजुरही असतात. ते सर्वच मजुरांची मजुरी वेळोवेळी अदा करतात.

त्यामुळे आसे गाव व परीसरामध्ये बंदबिगारी पध्दत प्रथमदर्शनी दिसुन आलेली नाही. तरीसुध्दा प्रसार माध्यमांच्या मार्फतीने पालघर जिल्हयातील सर्वच नागरिकांना आवाहन करण्यात येते की कोणत्याही ठिकाणी बंदबिगारी दिसुन आल्यास अथवा माहिती मिळाल्यास नियंत्रण कक्ष, पालघर येथे दुरध्वनी क्रमांक ८६६९६०४१००, ९७३०७११११९, ८६६९६०४०८४, पोलीस अधीक्षक यांचे कार्यालयीन ईमेल आयडी sp.palghar@mahapolice.gov.in अथवा नजीकच्या पोलीस ठाण्यात तातडीने संपर्क करावा. पोलीस दल कोणतीही तमा न बाळगता अशा व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करेल.

-----oooo------

Scanned with CamScanner